
# शंभू गणपुले



# यात्रा

# शंभू गणपुले

## **‘यात्रा’**

काव्य संग्रह

ई साहित्य प्रतिष्ठान

# यात्रा

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# लेखक : शंभू गणपुले

" योगिनी", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

संपर्क :जयंत करंदीकर

--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038 020-25384472, 9822439492

jayant. karandikar@gmail. com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www. esahity. com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP : https://play. google.com/store/apps/details?id=com.esahity.www.esahitybooks

**प्रकाशन : १५ जुलै २०१९**



©esahity Pratishthan®2018


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे.

# शंभू गणपुले यांच्या नवव्या पुस्तकाच्या निमित्ताने

ई साहित्य प्रतिष्ठानला ई पुस्तकांच्या प्रकाशनाच्या जगात अकरा वर्षं झाली. सुरुवात झाली ती नव्या तरुण लेखकांना आपले साहित्य प्रकाशित करण्यासाठी एक प्लॅटफ़ॉर्म मिळावा म्हणून. पण लवकरच अनेक चांगले ज्येष्ठ लेखक ई साहित्यच्या मार्फ़त आपले साहित्य प्रकाशित करू लागले. डॉ. मुरलीधर जावडेकर (बारा पुस्तके), डॉ. स्मिता दामले (६ पुस्तके), डॉ. नितीन मोरे(१६), डॉ. वसंत बागुल (बारा), शुभांगी पासेबंद (सात), डॉ. वृषाली जोशी (५), असे अनेक ज्येष्ठ लेखक ई साहित्य प्रतिष्ठानवर विश्वास टाकून आपली सर्व साहित्यसंपदा ई साहित्यकडे सोपवू लागले. ई साहित्य हा आपला फ़ार मोठा बहुमान मानते. एकीकडे जगभरात वाढता वाचकवर्ग आणि दुसरीकडे दर्जेदार लेखकांचा ई साहित्यकडे वाढणारा ओढा या दोन गोष्टी ई साहित्य, ई बुक्स आणि एकूणच मराठी साहित्यासाठी शुभसंकेत आहेत.

श्री. शंभू गणपुले हे एक प्रतिभावान लेखक. रोजीरोटीच्या जबाबदारीमुळे लेखनाकडे लक्ष देता आले नाही. पण एकदा का त्यांनी लेखनाला सुरुवात केली येव्हा ते एकाहून एक रत्ने मायमराठीला देऊ लागले. ताओ उपनिषद सारखं गंभीर तात्विक पुस्तक पेश करणारे शंभूजी 'अबक' सारखे विनोदी लेखनही करतात. आणि 'एक मोकाट वारं" सारखं रहस्यमयही लिहीतात. त्यांच्या लेखणीत दम आहे. भाषेत डौल आहे आणि विचारांत मुक्त आकाश विहरण्याची धमक आहे, साहस आहे. त्यामुळे ७८व्या वर्षीही ते एखाद्या तरुणासारखे नाविन्यपूर्ण विचार मांडतात. नव्या जगाला दिशा देऊ शकतात.

शंभूजींसारखे लेखक, जे स्वतःच्या समाधानासाठी लिहितात, कधीही शांत राहू शकत नाहीत. त्यांच्या प्रतिभेतून अशीच नवनवीन फ़ुले, फ़ळे व यात्रा जन्माव्या आणि लाखो लोकांना त्याचा लाभ व्हावा. अजून काय हवं?



लेखक: श्री. महादेव परशुराम उर्फ शंभू गणपुले

वय : आठ्ठ्याहत्तर

शिक्षण: बी. ए. , एल. एल. बी. , हिंदी विशारद

व्यवसाय: सेवानिवृत्त अधिकारी, नाबार्ड, सध्या लेखन,

प्रकाशित लेखन: "ताओ उपनिषद" ,

कथा-कविता संग्रह -२,

अंतरंग, एक मोकाट वारं, किती तुज समजावू सांग, असं पण होऊ शकतं

विशेष रुची: आतापर्यंत वेगवेगळया संस्थामधून १० नाटके बसविली. त्यात कामही केले. २ दूरदर्शन मालीकांचे ( साळसूद, घरकूल) लेखन, एका मालिकेत काम,

निवास: "योगिनी ", गणेश कॉलनी, मु. पेठ वडगांव, जिल्हा कोल्हापूर

©सर्व हक्क श्री. जयंत करंदिकर यांचे स्वाधीन.

जयंत करंदीकर


--- 3, Srirang, Gandhibhavan road, Kothrud,

Pune 411038 020-25384472, 9822439492

शंभू गणपुले यांची


ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े


प्रकाशित झालेली पुस्तके












अंतरंग
शंभू गणपुले


शंभू गणपुले
'अबक'


शंभू गणपुले
मिसळ


शंभू गणपुले
एक मोकाट वारं

# अर्पण पत्रिका

’ज्यानी माझ्यामधे लेख़नाची उर्मी निर्माण केली आणि माझ्याकडून काही लेखन करून घेतले ते माझे आजोबा   -माझ्या आईचे वडील- विद्यावाचस्पती श्री कृष्णाजी केशव कोल्हटकर, यांच्या स्मृतीस माझे सर्व लेखन मी समर्पित करत आहे.

-- शंभू गणपुले

**प्रस्तावना**

हा माझा पहिला आणि शेवटचा काव्य संग्रह. हा वाचल्यावर रसिक वाचकांच्या लक्षात येईलच की मी जन्मजात, आयुष्यभर काव्य निर्मितीत गुंतलेला कवी नाही, किंवा तो माझा व्यवसायहि नाही.

एका पाश्चात्य लेखकाने कवितेची व्याख्या करताना म्हटले आहे की, कविता म्हणजे कवीच्या 'मनात उठलेल्या भाव तरंगांचं उत्स्फर्त प्रकटीकरण'. ती व्याख्या लक्षात घेतली तर मी मनात उठलेले भावतरंग कागदावर उतरवले आहेत आणि ते पुस्तकरूपात प्रसिद्ध करण्याचं धाडसपण दाखवले असे म्हणता येईल.

या संग्रहात एकूण ३६ कविता आहेत. मी लिहून ठेवलेल्या अनेक कवितांपैकी छत्तीस कविताच वाचकांच्या हातात द्याव्यात असे मला कां वाटले ते सांगता येणार नाही. पण त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, मला फक्त कविता लिहीता येतात असे नाही तर बऱ्या किंवा चांगल्या कविता कोणत्या त्याच रसग्रहण पण करता येते.

या संग्रहात वाचकांना भक्ती, जीवनातल वास्तव, दांभिकपणा, उद्विग्नता, प्रणय, विनोद, तटस्थता अशा अनेक भाव-भावनांचे प्रकटीकरण झालेले आढळेल. रसिक वाचक कवितेतल्या त्या त्या भावनांचा आस्वाद घेत-घेत या संग्रहाचे स्वागत करतील अशी आशा आहे. धन्यवाद!

**- शंभू गणपुले,**

## १. वरदान

दिगंबरा मज द्या हे वरदान
अखंड माझ्या वाणी मधुनी
व्हावे तव गुणगान!

अनुसूयेचे भाग्य उमलले
दत्त त्रिमूर्ती बालक झाले।
पतिव्रतेच्या अंकी खेळती
शक्ती तीन महान ।।१।।

जगीं अवतरला तुम्ही तीनदां
भक्तां झाला इच्छित परदां ।
त्रिगुणां पुढती लीन जाहली
त्रैलोक्याची मान ।।२।।

चमत्कार बहुविध दाखविले
सत्य ज्ञान त्यातून प्रकटले ।
ज्ञाते, भाविक, पाखंडीही
चरणांशी रममाण ।।३।।

कुबडे, कुष्ठी, लुळे, पांगळे
दीन दुःखी तव दारी आले ।
क्लेश हरूनिया, पदरी टाकशी
जीवन दिव्य निधान ।।४।।

मीच एकला जगीं अभागी

तव भक्तीविण सुख उपभोगी

क्षमा करी श्रीपाद वल्लभा

मानव मीहि अजाण ।।५।।

✻ ✻ ✻

२.

# सिद्ध मुनी

भीमातिरी घालुन आसन -

बसले सिद्ध मुनी

सांगती गुरू महिमा रंगुनी ।।धृ.।।

सूर धरूनिया त्या ललिताचे

गायन चाले सुरसरितांचे ।

सुतार पक्षी धरतो ठेका

चंचू आपटुनी ।।१।।

भीमा-अमरजा जिथे भेटल्या,

स्वर्ग-वृत्ति बहू तिथे दाटल्या,

प्रकृतिच्या सन्निध पातला,

मानव दिव्य कुणी ।।२।।

भस्म कपाळीं, गळीं रूद्राक्ष.

आत्म-रंगी मिटलेले अक्ष

पद्मासनि ध्यानस्थ बैसला

बैरागी उपवनी।।३।।

फळा-फ़लांनी फ़लले उपवन

भवती जमले भाविक, सज्जन

चरण क्षाळुनी सिद्ध मुनीचे

बसले कर जोडुनी ।।४।।

प्रसन्न होतां गुरू भक्तावर

प्राप्त होतसे त्यां जगदीश्वर

गुरूंचा महिमा, सांगा आम्हा,

मुनिवर विस्तारुनी ।।५।।

तरल कुंचला वाणीचा तो

भक्त मनांवर चित्र रेखितो

रंग भक्तीचे नवधा भरले

गेले जन रंगुनी ।।६।।

## ३.	क्रांती

काय म्हणावे यासच क्रांती?

ग्रीष्म ऋतूच्या प्रखर उन्हाने
सुकली, पिवळी गळती पाने ।
देठाखाली परि तयांच्या
असते नव निर्मिती ।।१।।

कार्य संपतां जीव टाकतो -
जीर्ण शरीरा, आत्मा उरतो ।
मृत्यू विनाशी जरी भयंकर
त्यातूनच हो पुन्हा निर्मिती ।।२।।

शाश्वतातुनी निघे अशाश्वत
अशाश्वताचा नाशहि निश्चित।
चक्र फिरवतो निसर्ग त्याला
कुणी खुळे क्रांति म्हणती ।।३।।

आज पहा जिकडे तिकडे
क्रांतीचे झडझडती चौघडे ।
कर्महीन ते शब्द बापुडे
कर्मचुत ते वदती ।।४।।

कुणी छेडतो भू आंदोलन
देऊन भ़विहिनां उत्तेजन ।
स्वार्थाचे हे विकृत पोषण
साम्यत्वाची कुठे प्रचोती? ।।५।।

उत्कर्षाचा मार्ग भासतो,

वर्गविग्रहा कुणी पोसतो।

धनवंतांना करूनी निर्धन

निर्धन सत्तापदीं मिरवती ।।६।।

काय म्हणावे यासच क्रांती?

क्रांती म्हणजे कां विच्छेदन

विना संघटन वा अनुशासन।

जीवन संपे हेतू वाचुन

वृथाच प्रशकासम जन मरती ।।७।।

काय म्हणावे यासच क्रांती?

* * *

४. नाती

जगात नसते कुणी कुणाचे ।।धृ।।

वाल्मिकीशी जोडती नाती
वाल्याचे पण कोणी नव्हती ।
सौभाग्याचे तिलक मिरवती
डाग न पुसती कुणी रक्ताचे ।।१।।

मातीत घडवुन आपुली कल्पना
व्याध करि धनुर्वेद साधना।
शिष्योत्तम सा जरि तो द्रोणां
कपटें हरले ओज तयाचे ।।२।।

युगें युगें ही तऱ्हा चालते
निकषांवर नाते न उतरते ।
बलवंताचे खपून जाते
उजाड जीवन हो दुबळ्यांचे ।।३।।

कोण कुणास्तव जगतो, मरतो?
कोण कुणास्तव सतत कष्टतो?
माणुसकीचा गहिंवर येतो-
जेव्हा, ज्याला, जिथे सोईचे ।।४।।

जन्मा येऊन मानव पोटी

कळले, असती नाती खोटी।

आत्मा उरतो एक शेवटी

परमात्म्याशी  नाते ज्याचे ।।५।।

(या कवितेतील कडवं ३ आणि ४ ही दोन कडवी 'साळसूद' या दूरदर्शन मालिकेचं शीर्षक गीत म्हणून वापरली होती.)

* * *

## ५. युवती

मित्र म्हणाला काव्य करी रेऽ
या सुंदर युवती वरती.
काव्य विषय सा जरी ती नव्हती,
प्रतिभेला ये भरती.।।१।।

जाणुन घेण्या काव्य विषय
मी, तिला निरखले जरा।
नेत्र पटलावर, कभिन्न काळा-
उठला खोल चरा ।।२।।

घडवी एकच देव स्त्रियांना
एक देखणी, एक उणी।
न कळे कैसी दैवाची तू-
किमया की करणी? ।।३।।

कशास आलिस गेऽसामोरी
दुर्दैवाचे फरे।
सूड उगवतो, तुलाच सांगुन
तुझेच वर्णन खरे ।।४।।

अगेऽ अनंगे, तव प्रत्यंगे
नाहित ज्या त्या जागी।
नितंबापरि वक्ष वाढले
नितंब सुकी वांगी ।।५।।

गालावरती पडतो खळगा,
जिवणी रूंद दरी ।
तरारून त्यातून उसळली
दंत पंक्ति सुंदरी ।।६।।

रूईच्या पानातुनी पांढरा
जैसा चीक गळे ।
तव मादकता तशी ठिबकता
जन होती आंधळे ।।७।।

धनुष्यातुनी तुझ्या भुवईच्या
शत शर सुटतां वेगे ।
पोरे आलिंगती धरेला
काही पळती मागे ।।८।।

माथ्यावरुनी उडीच घेतो
केशप्रपात भुरा ।
घायपातीचा जणू ठेवला
पिंजुन तो भारा ।।९।।

वर्णायाचे एकच उरले
स्थान गडेऽ  नाभी
ज्वालामुखीचे भोंक जयाला
उपमा शोभे नामो ।।१०।।

* * *

## ६. विश्वरूप

देवा तुझे रूप सुंदर आगळे ।धृ।।

नाना रूपे ध्यानी, ज्यास आवडे जे
मन माझे शोधे त्रिगुणात्मक जे
पूर्ण चराचरीं दिसे ना वेगळे ।।१।।

पूर्वपश्चिमांत रूंद स्कंध देशीं
चौदा भुवनांचे ओझे सांभाळीशी ।
अष्ट दिशा बाहू, स्पर्शिती सगळे ।।२।। देवा...

ग्रह-तारकांचा कंठी तुझ्या हार
शल्य-माला कटी-बंध तो सुंदर
आकाश गंगेचे भस्म अर्चियले ।।३।। देवा....

हले पर्ण वृक्षीं तो तुझा निश्वास
सागराच्या लाटा, तुझे पदन्यास
चंद्र सूर्य तेजे चमकती डोळे ।।४।। देवा ....

मेघ बरसतो, ती तुझी करूणा
अंकुरे जीवन, ती तुझी धारणा
अग्नि कोप तुझा भक्षितो सगळे ।।५।।

चरा-चर व्यक्त व्यापूनी सगळे
अव्यक्ति उरशी देवा दशांगुळे
व्यक्त-अव्यक्ताचा माया खेळ खेळे ।।६।।

* * *

## ७. समजावणी

नको तरी रवि उषेस सोडुन, प्राचीवर पातला
प्रणय स्वामिनी ऊठ उशाचा हात अगे अवघडला ।।धृ।।
अंगावेगळं केलीस जी तू काल रात्रीच्या वेळीं।
कुडकुडती ती कर्णभूषणे, चुडा, पाटल्या, चोळी ।
मिरवलीस तू लेऊन ज्यांना तिरस्कार त्यां भला? ।।१।।
घे जवळीं, प्रेमे कुरवाळी, ऊब तया लागु दे ।
थिजल्या कंकणातुनी ते गीत पुन्हा उमटु दे ।
'होऽ''ना' तालावरी नाचु दे पुनश्च कर्णफ़लां ।।२।।
उघड पापण्या, टाकुन दे ते, तृप्तीचे ओझे ।
गहिऱ्या नेत्री पुन्हा उसळुदे अवखळ कारंजे ।
शपथ सांगतो, चळून देईन माझ्या मीच मनाला ।।३।।
बळेच करशी कानाडोळा या समजावणी कडे ।
उसळुन माझ्या गळीं टाकशी हाताचे कां कडे?।
सोड, ना तरी कळेल आपुले गुपित तुझ्या शेजीला ।।४।।
प्रणय स्वामिनी ऊठ उशाचा हात अगे अवघडला.

✻ ✻ ✻

## ८. भजन

तुझ्या सामर्थ्याची हवी मज खूण
दावी पांडुरंगा तुझे देवपण ।।धृ।।

जगत नियंता तू, जग कोठे जाते
तुझे बंद डोळे, कळावे कसे ते?
वेळीच सावरी उघडी लोचन ।।१।।

माजले मंबाजी, कुठाय तुकया?
रेकती महिशी, कुठाय ज्ञानिया?
धर्म संस्थापना करील ती कोण? ।।२।।

चिंतामणी तू! जन, चिंतेने ग्रासले
भोगाच्या भवंरी पुरत फसले।
उद्धराया तू ये ना, धाडी संतजन ।।३।।

✻ ✻ ✻

## ९. 'गोपती'(बैल)

मुक्तीसाठी कधी न झटणे,
चाकोरितच फिरणे जगणे ।
यातच सरते जीवन ज्यांचे
गोपतीच ते जणू घाण्याचे ।।१।।

स्वार्थ आणखी अहंमन्यता
परीघ आखला आपुल्या पुरतां ।
भूमि तीच ती पुन्हा तुडविता
समाधान ज्यां पुरःसरितांचे ।।२।।

जुन्या प्रेरणा जूं मानेवर
शब्द तेच ते फिरविती गरगर ।
विचार घाण्यातुनी टिपुसभर
तेल न गळते नाविन्याचे ।।३।।

नव्या मनुचा आसुड कडाडे
क्षणभर हलते चिवट चामडे ।
चाटुन पाठीवरिल कोरडे
निमुट शमवती दुःख स्वतःचे ।।४।।

गोपतीच ते जणु घाण्याचे ।

* * *

## १०. गणित

पुस्तक उघडून बसलो,
जीवनाच्या गणिताचे.

प्रथमच डोळ्यापुढे आले -
अंड-ब्रह्मांड शून्याचे-
प्रतीक ते छोटे अंतिम सत्याचे.

गरगरले डोळे, झिणझिणला मेंदू,
शून्य मनाने, शून्य टाकून देऊन
पान उलटले मी पुढचे!

पुढचे प्रकरण बेरजेचे
दिवस मिळवून दिवसात
बेरीज केली वाढत्या वयाची.
तिथंच शिकलो धडा वजाबाकीचा
एक-एक दिवस उणा होऊन
उडवत होता टवका आयुष्याचा.

घाबरला जीव, हदरलं हृदय-
लटपटले हात-पाय -
वाटलं त्यांना हवाय आधार !
तेव्हा गेलो मांडवा खालून-
एका कुमारिकेचा हात, हातात धरून,
आणि सुरूं झाला गुणाकार

तोंडाशी तोंड, कृतीशी कृती, प्रेमाशी प्रेम
क्रास झालं, आणि गुणाकाराचं उत्तर म्हणून
पोरं आणि वैफल्य जन्मा आली!
प्रत्येकाला पाहिजे होती -
त्याची, त्याची वाटणी-हर्विभाग!
अन्न, वस्त्र, अडोसा,
घर, सलवार, इडली, डोसा -
शिक्षण, नोकरी, मोटार-
भागाकार ! भागाकार! हाःहाःकार!
गरजांनी उत्पन्नाला पूर्ण भाग कधी गेलाच नाही
कर्जाची बाकी कधी शून्यावर आलीच नाही!
काळ, काम, वेगाचं संतुलन,
कधी साधलंच नाही.
आणि माझंच उदाहरण समोर आलं-
असा असतो अपूर्णांक!
तथाकथित पूर्णांक लोकांच्या कोपरखळ्या
मधुनच स्तुती सुमनांच्या चारोळ्या
समजावत होत्या मला 'चढती-उतरती भाजणी'
उतरणीला लागल्यावरच-
लेकी, सुना, मित्र-मैत्रिणी-
उपकाराचे सव्याज हात पुढं करतात.
उपकारावरचं चक्रवाढ व्याज देत बसलोय.
पण व्याजाचा दर माहीत नसल्यानं -

मुद्दल काढण्याच्या रिती पाशी अडून बसलोय!

आयुष्याचं गणित सोडवता आलं नाही.

तरी बरोबर उत्तर तरी लिहावं-

म्हणून पटापट पानं उलटली-

शेवटच्या पानावर एकच उत्तर होतं-

'मुक्ती'!

जाग आली, जाणीव झाली

सगळंच चुकलं आपलं

आधीच उत्तर बघितलं-

म्हणून एवढं तरी कळलं

आता पुन्हा केली पाहिजे

खुलासा, मांडणी रिती.

गणिताच्या अभ्यासाची

हीच फल श्रुती ।।

* * *

## ११. माणूस आणि कावळे

उजाड, धगधगत्या माळावर,
करपून पडलं होतं एक कलेवर,
कुणा काळ्या कुणब्याचे!
प्रेत असूनहि -
कुठंच आला  नव्हता फ़गवटा-
कुणब्याच्या भरवाळी अन्
डोळ्यांच्या खाचांची खोली पण,
तशीच होती.
चुरगळलेल्या चामडीची दुबळी धाबळ पांघरून,
पडली होती हाडकं दुर्बळ.
कोरडे, भेगाळलेले, विलग ओठ.
आक्रंदून मागत असावेत पाण्याचा एकच घोट.
तो होता, फसलेल्या पंचवार्षिक योजनेचा बळी!!

पोटातल्या अथांग  भुकेचा डोह-
पाण्यानं तरी भरावा-
आणि त्यांत सोडाव्यात स्वप्नांच्या मासोळ्या
म्हणून आला असेल तो -
अनवाणी, आग तुडवीत-
नदी, नाले, विहिरी, धरणं ओलांडित.

पण तेही होते त्याच्या सारखेच-

तहानेले, पाण्याविना कलेवर झालेले.

कुणबी, सगळी शक्ति एकवटून,

मेलेला हात ताणून, अंगुली निर्देश करीत होता.

मृगजळाच्या सागराकडे.

शे पन्नास कावळ्यांची काव् काव्

त्याच दिशेनं येत होती.

त्या मृगजळाच्या तळाशी

आणखि एक प्रेत विसावलं होतं-

एका काळ्या कावळ्याचं.

शे-पन्नास कावळे.

त्याच धगधवत्या माळावर, कोरड्या घशानं,

प्रेताभोवती फर धरून, धिःकार करत होते-

दुष्काळाचा! मृत्यूचा!!

जळजळीत जाणिवेचं घोगरं घुबड,

माझ्या मुर्दाड कानात, घुत्कारत होतं-

‘धिःकार असो मानव जातीचा-

केव्हढी संघटित जात कावळ्यांची!’

‘असंघटित माणूस जातीतला एकजण

मात्र, मरून पडला होता.... एकटा’!!

* * *

## १२. प्रेरणा

मनुष्यासवे जन्मते कर्म त्याचे
पडे माप पदरीं बऱ्या वाईटाचे।
व्यथा, हर्ष असती अहो एकट्याचे
कुणी पालटू ना शके रंग त्याचे ।।१।।

जसे कर्म आपुले, तसा यत्न आपुला
कुणी यत्न करूनी, सखासीन झाला।
असे पालथे हो, दैव ते आळशाचे
कुणी पालटू ना शके रूप त्याचे ।।२।।

मिळे यत्न अंती यशः पुष्प राशी
कधी टोचती तीक्ष्ण काटे अपेशी।
असो हार वा जीत ती एकट्याची
तिथे भागिदारी असे ना कुणाची ।।३।।

जगाच्या आरंभी मनू एक होता
तया कोण होता दुजा मार्ग दाता ।
धरूनी सुकाणू स्वयं प्रेरणेचे
उभे राज्य केले महामानवाचे ।।४।।

पडे विस्मृती त्या स्वयं प्रेरणेची-
अजि मानवा, वाट चाले धुक्याची।
धरावे उगा बोट वाटे कुणाचे
म्हणावे कसे मार्ग बरवे दुजांचे ।।५।।

तुम्ही जाणिले हे यथा योग्य वेळी
प्रयत्ने दुर्दिना सारले दूरवेळी ।।
स्वये वाचले लेख भाळावरीचे
आम्ही काय केले, तुम्ही स्वामी तुमचे ।।६।।

✻ ✻ ✻

## १३. जनरेशन गॅप

काळ्या चौकोनाच्या, कर्ण रेषेच्या-
टोकावर एक नाजुक मुलगी -
उभी होती.
टपोरे, काळे डोळे विस्फारुन,
हनुवटीवर इवलीशी तर्जनी ठेऊन,
काळ्या चौकोनातली गांडुळ गिचमीट
न्याहळत होती.
मी तिची अडचण क्षणात ताडली.
एक भटकी, वाट चुकलेली सापडली,
म्हणून टुणकन् उडी मारली, आणि
पढीक विचारवंताच्या घोगऱ्या आवाजात-
आवाहन केलं तिला -
'येऽ, माझ्या मागून'!
मंदिराला उजवं घालून, धर्माची सनातन वाट पकडली,
आडवे, कडवे, बडवे, वाड्यातनं डोकावून-
वाटच पहात होते आमची।
पण कर्मकांडी, दुतोंडी अजगराची बिळं टाळून
डावीकडं वळलो आम्ही.

त्या नव्या गल्लीच्या
नव्या नवलाईचे राखणदार
उभे होते अंतरा अंतरावर.
सीआरपीच्या जवानसारखे-
आम्हाला पुढे पुढे रेटत होते-
पुरोगामी ठरवण्यासाठी.

पुढे पुढे गल्ली गजगजली-
घोषणांनी-
कामगार एकतेच्या घंटा-
घणघणल्या,
शेकडो, हजारो कंठरवात-
तर्क, सभ्यता, स्वातंत्र्य, वादविवाद-
सगळंच नष्ट झालं.
उरली फक्त भुंकेगिरी-
धराऽ, पाडा, नष्ट करा!

हळूच उजव्या गल्लीत शिरलो मी
जिथे खुल्ला बाजार भरला होता-
मनसोक्त देवाण घेवाण चालू होती-
वस्तूंची, प्रेमाची, भावनां, बुद्धीची-
शरिरांची, शेअर्सची, शस्त्रास्त्रांची-
जीवन मरणाची.

अचानक चुकला हृदयाचा ठोका,
अनुभवाचे खरे, फाटक्या पायाखाली रगडत-
घेतली निर्लज माघार! आणि येऊन पोहोचलो
काळ्या चौकोनाच्या, कर्णरेषेच्या टोकावर.

इवलीशी तर्जनी, हनुवटीवर ठेऊन
काळे टपोरे डोळे विस्फारून
नाजुक, सुंदर मुलगी तशीच उभी होती
आणि मला विचार होती-
'आजोबा, काय ही तुमची अवस्था?'
'मी तुम्हाला घरी पोहचवू'

***

१४. गरीब

जागे करूनी कां पुशितां मज
अरेऽ, कोण तू, कुठला?
जीव एक मी नगण्य, कणसा-
रस्त्यावरल्या धुळीतला।
मी दुबळा, मी कष्टी, मी गरीब, देशामधला
मी विचार, बुद्धी शून्य मी अशी-
ओळख माझी मजला ।।१।।

दोन लक्तरे परस्परांना
उघड्या रात्री भिडती,
उघड्या वरच्या संभोगाला
साक्षी नभ, धरती ।
जिथे अशी जाहली धारणा
तिथे तशीच प्रसूती
पथचाऱ्यांच्या समक्ष पडलो
जन्मुन रस्त्यावरती ।।२।।

आईपासुन बाळ तोडले
नाळ ठेचुनी दगडाने,
टाळू भरली रक्ताने, अन्
स्नान तापल्या मातीने ।
ओठां लाऊन सुकाट बोंडे
बळे पाजली स्तनपाने

भूक फोडतां टाहो, कांजी-
शिळी पाजली करवंटीने ॥३॥

बाळपणी खेळलो घेऊनी
फ़टकी डबडी, गळकी मडकी
मुडुसलेल्या अंगी ल्यालो
लेणी चिंध्यांची मळकी ।
कुशीत कुजक्या झोपी गेलो
चिलाप ऐकत, गाणी सुतकी
ओंगळ पेक्षा शैशवातुनी
घडले, पुढले जीवन बाकी ॥४॥

शरीर राकट आणि रांगडी
बोली मूखांची,
व्यवहारावर नव्हती चकाकी
संस्कृतीच्या वर्खाची ।
भल्या-बुऱ्याची जाणहि नव्हती-
चीड न अन्यायाची,
पृथ्वी सम मी शिरी वाहिली
ओझी दुसऱ्यांची! ॥५॥

असेच गेले पाव-शतक, ना
दैन्यावस्था गेली,
आमच्यासाठी जरी बंद, अन्
निदर्शने झाली ।
जरी सांडले रक्त कितीनी
आपुल्या धमन्यातले,

जरी साहिले थकल्या अंगी

पोलिस लाठी हल्ले ।।६।।

गर्वे उंचावली आमुची

मान, अणु-स्फोटाने,

शक्य कुणा ना नजर वाकडी

अम्हावरी रोखणे ।

अस्थिपंजर जरि जनता ही

देश असे बलवान

प्रत्यक्षाहुनी कल्पनेतले

गरिबां सूख महान ।।७।।

सत्ताधानो अणुस्फोटाची

आतिष बाजी करा

गरिबांचे विपळाव बुडावे

असा पिटा डांगोरा

मातीतुनि जन्मा आलो

धूळ माझो माता

कुशीत धुळिच्या किरणोत्सर्गी

मला निजू दे आता ।।८।।

जागे करूनी नका विचारू 'अरेऽ कोण तू कुठला?'

मतदारांच्या यादी मधुनी गायब मी झालेला।

***

१५.

## जलबिंदू

मी जलबिंदू बावरलेला ।

अज्ञ पोकळीतून जन्मलो,
अथांग उदधीच्या उदरी शिरलो,
मेघकुळाला टाकुन आलो,
मागे किती ते ना कळलेला ।।१।।

कुळ ते माझे म्हणावे कसे ?
रंग, रूप, गुण सारखे नसे
अग्रज कोठे, कुठे अनुज असे
त्या सर्वांना अंतरलेला ।।२।।

मूळ स्वभावा विसरलो पुरा
पडुन सागरीं झालो खारा,
म्हणुनच कां करती तिटकारा
या शंकेने पोखरलेला ।।३।।

कधीनं कुणाशी जडली मैत्री
एकटाच मी अफाट क्षेत्री
भटकत होतो दिवसा रात्री
परित्यक्त सा ज्ञाती मधला ।।४।।

तीर्थ हो कुणी प्रभु पाईचे
बनती मोती स्वाति बिंदुचे
भाग्य वेगळे ज्याचे त्याचे
नियतीशी मी जोखडलेला ।।५।।

माझ्या सम हे अनेक असती

प्रवाह पतित पण सुखे नांदती

शल्ये मग कां मलाच खुपती

या कोड्यातच गुरफटलेला ।।६।।

✻ ✻ ✻

## १६. सोळाव्व वरीस

वय माझं झालं सोळा
वारा अनोळखी आला
रोम रोमांत शिरला
बळे चहाटळ मेला ।।१।।

तेव्हा मज काय झाले
पोरखेळ नको झाले
वाटे नक्को छप्पा पाणी
टिकऱ्या वा काचा पाणी ।।२।।

हूड चोळी परकर
दिली ठेवुनिया दूर
माझी लज्जा गाभूळली
पांच वारीं लपविली ।।३।।

पाय ठरेना घरात
ऊठ बैस मैत्रिणीत
झिंगल्या पाऊल वाटा
तुडवीती स्वप्न वाटा ।।४।।

येतां कुणी समोरुन
घेते ओठ मुरडून
डोळ्या वाटे बडबडे
मेले तारुण्य बोबडे ।।५।।

कुणी टंच खुणावता
घेते पाय मी काढता
पण चरके कालिज
कां तटाटले ऊरोज ।।६।।

कटी खालची गोलाई
कां न्याहळते आई?
कोडी सोळा वरसाची
कधी नाही सुटायची ।।७।।

✻ ✻ ✻

## १७. कुंपण

आत्म्याला कुंपण शरिराचे.
शरीर अडकलं कापडी कुंपणात
वस्त्रासकट शरीर रखडतंय -
घरादाराच्या कुंपणात!
घरादारामधे, भावाभावामधे-
पडलय्, कुंपण - कायदेशीर हक्कांचं
कायदा जखडलाय्
देश, धर्म, न्याय, नीति, परंपरांच्या कुंपणात
देश गेला नाही अजून-
पृथ्वीचं कुंपण तोडून.
पृथ्वी गरगरलीय सौरमंडळाच्या कुंपणात!
सौर मंडळाला कुंपण?
कल्पनेला पडलंय् कुंपण कुंपणाचे.
बिंदु मात्र कुंपणाच्या आंत-
विव्हळतोय् नगण्य स्वातंत्र्याचा चिरका आवाज
उर्मट, भावनाहीन आधाशी कुंपण-
कुरतडतंय रक्ताळलेलं भक्ष आपलं!!

* * *

# आधार

पेल्यात बुडवली सगळी स्वप्ने।।

भासत होते इंद्रधनू सम

सप्तरंगी हे माझे जीवन।

पंख गळाले, रंग उडाले,

नियतीच्या धक्याने ।।१।।

जनसेवेचे बांधुन कंकण

देशासाठी झिजविन कणकण

घोर प्रतिज्ञा तरूणपणीच्या

उगाळतो बेताने ।।२।।

गाठायाची होती उंची

अतर्क्य, स्वर्गिय मज प्रेमाची

आता उरली संभोगाची

केवळ आवर्तने ।।३।।

भग्न मी आतां वास्तु पुरातन

उभे साथिला विलग देह-मन

मीच खिदळतो पाहुन माझे

विद्रुप जीवन लेणे ।।४।।

पोकळ हसणे पोकळीतले

प्रतिध्वनीने भेसुर केले

बधिर कानीं परि पेल्यांचे

किण् किण् ये गाणे ।।५।।

जळली जाणिव, भावहि विरले

दग्ध ध्येय अन् मन झाकळले

शन्याचे शोभिवंत प्याले

भरले मद्यार्कांने ।।६।।

चंद्र-रवि उदयास मोजतो

खळगी भरण्याआता झगडतो

नियती मागे खुरडत जातो ।

कुजक्या आधाराने ।।७।।

पेल्यात बुडविली सगळी स्वप्ने ।।

✻ ✻ ✻

## १९. साधना आणि सिद्धी

तप्त माळावर उभा जो
राहिला वेळूच वेळू
स्पर्श झाला वायुचा ना
वाजली ना धुंद वेणू
पोळलेल्या साधनेला
सूर स्वर्ग न लाभले
गीत त्याचे हे खुळे मी
म्हणून लिहिले, गाईले ।।१।।

शुष्क निर्झर बाजुचा
देईच ना संजीवनी
बेट जळता, सारसहीने
वाट विसरूनी गेले
की यशाची आंस सरतां
संग साथी पळुन गेले ।।२।। गीत त्याचे...

देह पिचकी एक तारी
भंगलेला अन् अभंग
ताल धरतो बद्द ठेका
हृदय पिंडाचा मृदंग
अंत्य यात्री योग्य,
समजून त्याला कापले ।।३।। गीत त्याचे

बांधले प्रेतासवे अन्

घेतले खांद्यावरी,

स्पर्श तितुका उन्नतीचा

भरून उरला अंतरी,

पेटल्या सरणांत त्याचे

कुयश सारे संपले ।।४।।

थोर, साने जीव येतां

मृत्यूच्या रे अंगणी

साधना, सिद्धी तयांची

संपते रे त्या क्षणीं

मृत्युच्या ज्वाळेतुनी हे

स्वर्ग- स्वर मी ऐकले ।।५।।

✻ ✻ ✻

## २०. गानं साताऱ्याचं

गानं साताऱ्याचं गातो
आठवुनी ते दिवस ।
गाव सोडल्याला झाली-
वर्सं पूरी पन्नास ।।१।।

नाती गोती निखळली
घरां-दाराचा इस्कोट ।
पांच पिढ्याची पुण्याई
झाली की हो भुई सपाट ।।२।।

बाप ज्याद्यांची कमाई
गेली त्याचं दुःख न्हाई।
दुःख गावाच्या वेशीनं
मला अडवलं न्हाई ।।३।।

माती भाळीं मिरवली
समजूनी गंध बुक्का ।
तिच्या किरपेनं घावली
मला सोनियाची लंका ।।४।।

ओलाव्यात नहालेला
ल्योक भान हरवतो ।
आठवुनी ते दिवस
गानं साताऱ्याचं गातो ।।५।।

उगवतीं यस्टी स्टँड
मावळती यवतोबा ।
ऐस पैस घसरली
माज्या सहराशी शोभा ।।६।।

पेठ, आळी, गंज, गोट
गाव त्यात विभागलं ।
राजवाड्या म्होरं पुन्ना
गाव एक जीव जालं ।।७।।

शाहू राजे शिवबाचे
जरी होते हो वारस।
तरी राजे कमी होते
त्यांचं साधुत्व सरस ।।८।।

पेशवाई शिरीमंती
दिली धाडून पुण्यास।
भोळ्या भाबडेपणाचा
वसा दिला सातार्‍यास ।।९।।

घिसड्याच्या पारा म्होरं
मंगळ वाराच्या हो पेढीं
घर माजं जिथं झाल्या
जल्म जल्मांतराच्या भेटी ।।१०।।

माजं घर ते चौसोपी
काका काकू आई बाप।
दंगा, खोड्या केल्या तरी

एक सोपा करी माफ ||११||

माय खोडसाळ, मारी

उगे रागे थोबाडीत|

काकू मायेनं मोदक

भरी सूजल्या तोंडात ||१२||

मित्र-मैत्रिणी माझ्या

चोरलं हो बालपण|

भावा-बहिणींनी मोठ्ठं |

केलं, मला नाही जाण ||१३||

काळी माती साताऱ्याची

घाम पीते पोट भर |

देई घामाची किंमत

दानं धाडूनिया वर ||१४||

दान्या दान्याच्या भारानं

खाली झुकली कणसं|

कणसांच्या ओझ्या खाली

भारावली हो माणसं ||१५||

मूग, तुरीच्या तुराट्या

उभ्या वावरात ताठ |

लाल मिरचीशी, मेला

करी टामाटु लगट ||१६||

गोटा वांग्या चवळीला

उगा वाकुल्याच दावी|

हुंड्यासाठी पावट्याच्या
शेंगे संगं पाट लावी ।।१७।।

ऊस साकऱ्या डोलतो
जणू जिंकलाय फड।
आल्या-गेल्या पावण्यांचं
तोंड करी गोड गोड ।।१८।।

लाल भोपळ्यानं केला
जवा काकडीशी ठाव।
अधांतरी टांगलेला
दूध भोपळ्याचा जीव ।।१९।।

फळा-भाज्यांचा हा द्वाड-
खेळ, तवाच थांबतो!
कारबारनीचा हारा-
भाजीपाल्यानं भरतो ।।२०।।

✻ ✻ ✻

## २१. रंग-बेरंग

कुणी म्हणे मातृभूमिचा
रंग माझिया असा
कुणी म्हणे पितृ भूमिचा
रंग माझिया तसा
रंगातुन रंगे वाद
रंग-रंगांचा
माणूस विसरला
मूळ रंग मातीचा ।।१।।

माणूस निघाला करण्या
रंगाचा बे-रंग
रक्त सांडतो मूर्त कराया
अमूर्त स्वप्न सवंग
रक्तात भिजोनी पृथ्वी झाली
तप्त, तांबडे डिंब
तेव्हा द्रवले, पाझरले, निवले
सहस्त्र रश्मी बिंब ।।२।।

जीव जिवांचे जीव
घेऊनी पडले धरणी वरती
मीच एकटा उरलो करण्या
सूर्या वरती वस्ती ।।३।।

* * *

## २२. लीन हो मना

धन, गृह, दारा, सुख संततिची
अजुन न सरली कारे वासना
सद्‌गुरू चरणीं लीन हो मना ।।धृ।।

उगीच आईची कूस शिणविली
वणवण पृथ्वी पायी तुडविली ।
यश सुख नाही सदैव टिकली
अनुभवशिल रे किती यातना ।।१।।

जन बडबडी वाद घालती
सत्य, असत्यावर खल करिती ।
अबोध मन मग करी भ्रमंती
खटपट सोडुन दे ती सुजाणा ।।२।।

जन्म-मृत्युची धुंडून शहरे
खट-खटविलीस तू द्वार, मंदिरे ।
रिक्त हात, मनीं परतलास रे
अजुन जीवन जरी बोध घेईना ।।३।।

पतितांच्या सुख नगरी घेतले
नाम सहज ते पुण्यच ठरले ।
तुज हेरुनिया गुरूनी बोधिले
अखंड करि आता  नाम साधना ।।४।।

***

२३. दव भेटला

हो त्याला देव भेटला ।।धृ।।

नारी सुंदर चंचल

पाहुनिया जो  ना चळला ।।१।।

तीन दिसांवरी नाही

भोग वस्तू साठा केला ।।२।।

स्वार्थापोटी वर्मी धाव

नाहि कुणाच्या घातला ।।३।।

हातीं कुऱ्हाड, कोयता

तरी वृक्ष पूजियेला ।।४।।

मुलं, स्त्रिया, रोगी, वृद्धां

सावरण्यां सरसावला ।।५।।

बिकट, वाट, संसाराची

तरी भजनीं रंगला ।।६।।

एक राम नामासाठी

गोदवल्यास धावला ।।७।।

होऽ त्याला गुरू भेटला ।

होऽ, त्याला स्वामी भेटला ।

सांगा, देव भेटला ।।

* * *

## २४. यात्रा

तीर्थाटन ना, नसे पर्यटन
ही यात्रा अपुली अवघे जीवन ।।धृ।।

यात्रिक सारे वाट तुडविती
सदा संगती कुणी न येती ।
साळसूद पण पुढे मिरवती
धन्य मानुन स्वतःस पावन ।।१।।

तमा न कोणा, कोण संपला
कोण चालला, कोण जिंकला ।
अश्व गतीने कोण धावला,
मन वारूवर आरूढ होऊन ।।२।।

लाट लंघुनी सुख-दुःखाची
पैल तिरीं ना पोंच कुणाची ।।
चढा-ओढ पण तू-तू मींची
त्या स्पर्धेतच जाणे संपुन ।।३।।

* * *

## २५. माणुसकी आणि कोंबडकी

कोंबडकीच्या वयात आलेल्या पिल्लाला
उकिरड्यावर सापडलं-
एक ताजं निरोध!
चोचिन निरोध धरून पिल्लू धावलं
आई कडं आणि म्हणालं-
'आईऽ, आईऽऽ, मला याचं आमलेट करून दे'
कोंबडी पिल्लाला चावली आणि म्हणाली-
'जा मेल्या, जिथून आणलंस तिथंच टाकून येऽ...'
लंपट माणुसकी उकिरड्यावर आली
तरी
आपण कोंबडकी सोडू नये.

* * *

## २६. विश्वरूप

देवा तुझे रूप सुंदर आगळे ।।धृ।।

नाना रूपे ध्याती ज्यास सापडे जे

मन माझे शोधे त्रिगुणात्मक जे

पूर्ण चराचरी दिसे न वेगळे ।।१।। देवा

पूर्व पश्चिमेच्या रूंद स्कंध देशी ।

चौदा भूवनांचे ओझे सांभाळिशी ।

अष्ट दिशा बाहू स्पर्शिती सगळे ।।२।। देवा

ग्रह तारकांचा कंठि तुझ्या हार ।

शैल्य-माला कटीबंध तो सुंदर ।

आकाशगंगेचे भस्म अर्चियेले ।।३।। देवा

हले पर्ण वृक्षीं तो तुझा निःश्वास ।

सागराच्या लाटा तुझे पदन्यास ।

सूर्य चंद्र तेजे चमकती डोळे ।।४।। देवा

मेघ बरसतो ती तुझी करूणा ।

अंकुरे जीवन ती तुझी धारणा ।

अग्निकोप तुझा भक्षि तो सगळे ।।५।। देवा

मानवाची बुद्धी, श्वापदांची शक्ति

तुझ्या प्रेरणेच्या त्याच अभिव्यक्ति

व्यक्त अव्यक्ताचा माया खेळ खेळे ।।६।। देवा

२७. ओम् अशांतिः

जघन प्रदेशातल्या मऊ भूमीत

एक बाय् अडीचचं-

जन्मतःच तयार आहे-

लंब वर्तुळाकार यज्ञ कुंड

पेटवायची गरज नाही, ते धगधगतंय आहे!

कोटी कोटी ऋतु-विद पण तयार आहेत-

यज्ञ कुंडात आपल्याच ओजाची आहुती द्यायला-

सकाळी, दुपारी, संध्याकाळी, रात्री-वेळीं अवेळी!.

उद्घोष पण सतत चालू आहे

वासना वेदाचा.

निस्तेज, उघड्या-नागड्या, बोडक्या-

करोडो जिव्हा उसळताहेत

यज्ञकुंडाच्या बाहेर,

आणि मागत आहेत आपापला भाग

करवंट्या पुढं करून,

धक्का-बुक्की करून!!

करवंटीत पडतोय्, हाती लागतोय् हविर्भाग

त्याच वासना यज्ञाचा

आणि भूमिती श्रेणीनं-

मांडली जात आहेत पिढीजात यज्ञकुंडं.

सगळ्यांचीच पडणार आहे त्यात पूर्णाहुती

ओम् अशांतिः ओम् अशांतिः ओम् अशांतिः

विश्व रूपाशी स्वतःला जोडण्याचा

खेळ खेळणारे

भूमिती श्रेणीनं कमी कमी होत आहेत.

वासनांनी धगधगणाऱ्या यज्ञकुंडातून मात्र

भुकेल्या जिभांच्या पिढ्यांच्या पिढ्या उसळत आहेत.

या सगळ्यांची एकच निष्पत्ती

ओम् अशांति!

त्याच्याच जोडीला करून ठेवलीय्-

गांडुळ गिचमीड,

उजव्यांनी, डाव्यांनी, विचारवंतांनी

अशास्त्रीय वैज्ञानिकांनी-

पुरोगामी प्रतिगाम्यांनी-

सेवकांनी, भाविकांनी

काळ्यांनी, गोऱ्यांनी

रंगहीन राजकीय नेत्यांनी

आंधळ्या डोळसांनी!!

ती गिचमीड टाळून

नातच दाखवील वाट

सत्तरी ओलांडलेल्या आजोबांना. ।।

***

२८. वाटाड्या

काळ्या चौकटोच्या -
कर्ण रेषेच्या वरच्या टोकावर
उभी होती एक नाजुक मुलगी,
काळे टपोरे डोळे विस्फारन,
इवल्याश्या हनुवटीवर तर्जनी टेकून
न्याहळत होती
काळ्या चौकटीतली गांडुळ गिचमीड!

तिची अडचण क्षणात ताडली अन्
मी टुणकन् उडी मारली-
एक वाट चुकलेली सापडली!
आवाहन केलं तिला
पढीक विचारवंताच्या घोगऱ्या आवाजात
म्हटलं 'ये माझ्या मागून
माझं बोट धरून.'

मंदिराला उजवं घालून,
पकडली धर्माची वाट सनातन
त्या अरूंद बोळात
कर्मकांडी, दुतोंडी, आडवे, बडवे, कडवे-
बांधून मोठ मोठे वाडे -
वाट पहात होते आमची

मोर पंख्याचे फटके देऊन-

पाण्याचे हबके मारून, अन् मळवट भरून-

आमचा खून करण्यासाठी!!

घाबरून डाव्या गल्लीत शिरलो आम्ही,

गल्लीतल्या नव्या नवलाईचे राखणदार-

(सी.आर.पी.च्या जवानांसारखे)

उभे होते अंतरा अंतरावर.

चंग बांधला होता त्यांनी

आम्हाला पुढे पुढे रेटून, पुरोगामी ठरवण्याचा!

गल्ली पुढे गजबजली

घोषणांनी मजमजली

'नाही रेंच्या' एकतेच्या घंटा घणघणल्या

तर्क, वादविवाद, विचार-व्यक्ति स्वातंत्र्याच्या

चिता धगधगल्या,

शालीनता, सभ्यता, माणुसकीच्या अस्थि

विसर्जित होत होत्या-

संघर्षाच्या पवित्र कुंडात.

जिवाच्या आकांतानं आलो पळून,

छोट्या, नाजुक मुलीचा हात धरून,

डाव्या गल्लीच्या तोंडाशी बसलेल्या

शुक्राचार्यांची नजर चुकव्न.

हळूच शिरलो आम्ही

उजवीकडच्या बाजारपेठेत

देवाण घेवाणीच्या खुल्या दुनियेत!!
चालू होती खुल्लंखुल्ला खरेदी विक्री
वस्तूंची, प्रेमाची, भावनांची, बुद्धीची
भरगच्च शरीरांची, शेअर्सची, शस्त्रास्त्रांची
मंत्र्या-संत्र्यांची, मंत्र्यांच्या खुर्च्यांची
घोटाळ्यावर टाकायच्या पांघरूणांची!!
म्हटलं एक तरी घेऊया मोकळा श्वास!
पण त्या मोकळ्या हवेनंच-
फ़्फ़्फ़ुसाला सूज आली-
अन् रक्ताची उलटी झाली.

क्यूरेटिन केलेल्या पृथ्वीची
आर्त किंकाळी कानी आली
अनुभवाचे खडे
फाटक्या पायांनी तुडवत
घेतली तिथूनहि माघार!!

उजवी बाजारपेठ -
डावी गल्ली-
मधला गोट -
मागं टाकत टाकत येऊन ठेपलो,
काळ्या चौकटीच्या कर्णरेषेच्या टोकावर.

हनुवटीवर, इवलीशी तर्जनी ठेवून,
काळे टपोरे डोळे विस्फारन,
नाजुक सुंदर मुलगी तशीच उभी होती!

(म्हणजे ती माझ्या मागं आलीच नव्हती!)

'माझं ऐकलं नाहीत. आता बसा!'

टाटा करून निघून गेली ती-

माझ्याकडं पाहून हंसत हंसत-

स्मार्ट पॉकेट कॉम्प्युटरच्या मदतीनं-

गांडुळ गिचमिडीतून वाट काढत काढत!!

'स्मार्ट' यंत्रं आली, अन्

माणसाला माणसापासून दूर करून गेली

स्वार्थ आणि अहंकाराची त्यात भर पडली

मानव जात किती विघटित होणार आहे?

संघटित होण्याचं महत्त्व, माणुसकीचं महात्म्य

माणुस जातीला आता-

कावळे आणि कोंबड्या कडून

शिकावं लागणार बहुतेक! कारण

विचारहीन बुद्धिहीन कावळे, कोंबड्यांनी

आपली कावळकी, कोंबडकी

जिवापाड जपून ठेवली आहे.

* * *

## २९. नांदी

हास्य, विडंबन, विषाद

शृंगार, करूणा, उन्माद

राग, द्वेष, मैत्री, शोक

हाऽहाऽ! .... खिःखिः! ... उफ्

हुँऽऽ! अरेऽऽ! हुर्रेऽ!

हुडुत्! हट्! व्वाऽ! ऊँऽ ऊँऽऽ ऊँऽऽ

भावना आणि त्यांचे तरंग

प्रकट करण्याचे स्वर, शब्द

पिढ्यान् पिढ्या तेच .... तसेच आहेत.

मुळाचा शोध घेत गेलं तर

ॐकारा पाशी येऊन थडकतो माणूस

पहिल्या भावनेचा, पहिल्या वासनेचा

पहिला स्पंद..... नव्हे,

मात्रेची नांदी!

**(राग केदार- ताल त्रिताल)**

ॐकार स्वर सूत्र धार ।।धृ।।

गिरिजावर, गंगाधर सुंदर

जगत नाट्य चालती निरंतर

दिग्दर्शक नटराज स ईश्वर ।।१।। ओंकार ।।

रम्य कथा रचयिता गणपती

शब्दांकित त्या करित सरस्वति

राग आळविती नारद तुंबर ।।२।। ओंकार ।।

विश्वकर्म करविली सजावट

निसर्ग पुरवी बहुरंगी पट

रंगमंच उभारीला धरेवर ।।३।। ओंकार ।।

रंग रवि उधळे किरणातुनि

संध्या रमली छाया लेखनि

नाट्य पाहती सुर, नर, किन्नर ।।४।। ओंकार ।।

✻ ✻ ✻

# ३०. व्यासांचे उष्टे

मानवाच्या अकलेचं दिवाळं निघायला लागतं तेव्हा

उत्क्रांतीच्या प्रवाहातच

परागतीचा कडेलोट होतो

पण माणूस ते मान्य करत नाही.

समोर यणारा क्षण, एक एक कण

नाविन्याची चकाकी घेऊन यतं आहे

असं भासतं.

पण व्यासांनी फकलेल्या

उष्ट्यातलाच तो एक कण असतो

याची जाणिव कुणाला असते?

व्यास मुनिंनी म्हणती केले

हे जग सारे उष्टे.

त्या उष्टयावर आम्हि कवीनी

भरली आपुली पोटे ।।१।।

काम वेगळे शोधायाचे

मित्रांनो, या जगती

तेच जुने नभ तीच हि धरती

तीच असे माती ।।२।।

चंद्र, सूर्य, ग्रह, तारे, वारे

ऋतू तेच सारे

सागर, सरिता, कडे कपारे
डोंगर पर्वत शिखरे ।।३।।

किडे, किटाणू, पशू श्वापदे
वृक्ष, लता, पाखरे,
वाऱ्यावरती तशीच डुलती
हिरवी शेत-शिवारे ।।४।।

या सर्वांना बघणारा तो
माणुस फक्त बदलला
जुन्या कणाला क्षणा क्षणाला
अर्थ नवा दिधला ।।५।।

अर्थ नवा गाठतो क्षितिजे
नवी ध्येय उंची
नव्या जाणिवा नवीन दृष्टी
नवी प्रचीति साची ।।६।।

जरी असली उष्टि कहाणी
कवि, रसिक परंतु गुणी
खरकटे निवडुनी त्यांनी
काढली सान हिरकणी
नव क्षितिजा वरिल चांदणी ।।७।।

पथदर्शक त्या ताऱ्यावरती
नजर रोखुनी धरा
शंभू शाहिर विनवी टेकुन-
माथा, जोडुन करा ।।८।।

## ३१. कोरी पाने

मात्रेचा शेवट

तोच जीवनाचा शेवट

त्याची चाहूल लागते

तेव्हा एक उबळ यते

सिंहावलोकन करण्याची

कुठं काही लिहून ठेवलेल्या

विचारांची, अनुभवाच्या  नोंदीची

उजळणी करण्याची.

पण तेव्हाच कळतं

की लिहून ठेवलेल्या

पानापेक्षा कोरी पानं

जास्त बोलकी आहेत.

नशीबात नसेल

तर कोरी पानंही

हाती लागत नाहीत.

डायरीच्या कांही पानावर

पांढऱ्यावर काळं केलेलं असतं

पोटाची खळगी भरण्यासाठी-

कुणाला सुखावण्यासाठी ड्ढदुखावण्यासाठी

कुणावर सूड उगवण्यासाठी

प्रसिद्धीसाठी -

दारूच्या अमलाखाली -

संस्कृतीच्या दडपणाखाली -

आलेला नॉशिया

ओकून टाकण्यासाठी !

सगळा निचरा झाल्यावर -

उरतात ती कोरी पानं -

न लिहोण्यासारख्या, पण आठवण्यासारख्या

आठवणीनं भरलेली पानं!

तीच पानं शोधत होतो मो

माझ्या डायरीची, पण

चतुर वाळवीनं

तेवढीच पानं खाऊन टाकली होती!

✻ ✻ ✻

## ३२. इंदिरेची आरती

जय देवी जय देवी, जय जय इंदिरा
थरथरला बघ भारत येतां तव फरा ।धृ।।

नेहरू महामेर ज्या आसनीं बसले
वामन रूपी शास्त्रीनंतर शोभले ।
निजतां लालबहादुर तुजला फावले
राज्या तुझ्या बापाचे तुवा गिळियेले ।।१।।

मोरांबा बलसाडी घात त्यां करशी
अलगद उचलुन टाकशी मैसुरची माशी ।
वंग, मुंबई, केरळ, दिल्ली नेत्यांशी
ऊभी ठाकशी तू मल्ल युद्धाशी ।।२।।

कडकडले शब्द, तै प्रचार धडधडला
धगधगला सूडाग्नी, मत्सर भगभगला ।
आकाशाला भिडली स्वार्थाची ज्वाला
सत्ता लोलुपतेला अंत ना उरला ।।३।।

संतत त्रस्त चेहरा, विस्फोटित डोळे
रूप तुझे चामुंडे ऐसे आगळे ।
बघतां नरश्रेष्ठांचे वीर्यहि गळे
सह्य न हो जया तो, तवचरणीं लोळे ।।४।।

जय देवी जय देवी.............

(सर्व राजकीय नेत्यांची क्षमा मागून )

* * *

## ३३. इंदुचा भोंडला

ऐलमा पैलमा कोसिजीन देवा,

माझा खेळ मांडुन दे, करीन तुझी सेवा ।।१।।

माझा खेळ मांडला, ताश्कंदच्या वेशी

शास्त्रीजींना पुरलं शांती वनाशी, ।।२।।

सगळ्यांना हवी बाई मोकळी खुर्ची

अनेकांच्या ××× लागली मिर्ची ।।३।।

कांडाबाई मिरची, उधळे खखाणा

भारताच्या बोकांडी नेहरू घराणा ।।४।।

तुमचे विरोधक, आमचे विरोधक

मारतील काय? ....... बोंबा! ।।५।।

दुताड्यांची पिकली पोळी ।

डांगे भाई दे रे तू टाळी ।।६।।

टाळी देऊन गेला डांगेऽ।

रशियापाशी भीक मागेऽ ।।७।।

भिकारी मेला व्याजा खाली

हातोडा कोयत्याला कुणी न वाली ।।८।।

रशियानं धरली इंदु हाताशी ।

मताच्या पेटीतून तिचीच सरशी ।।९।।

मंत्र्या तुझी पांच वर्षे

डांगेऽ, तुमची शंभर वर्षे ।।१०।।

आतुला, मातुला

काँगीत धातुला ।।११।।

सिपिआयचे दगड गोटे

हात-पाय पसरती लाळ घोटे ।।१२।।

एक-एक गोटा शंभर किलोचा

मास्को वारी करायचा ।।१३।।

दुसरा गोटा काँगीचा ।

पांढरे कपडे नेसायचा ।।१४।।

नेसा रे नेसा लुच्चानो

काँगीची मर्जी पावल्यानो ।।१५।।

* * *

३४. भोंडला-२

एक लिंबू झेलू बाई दोन लिंबं झेलू
तीन लिंबं झेलू बाई चार लिंबं झेलू
पांच लिंबं झेलू बाई पाच लिंबं झेलू
पाचा लिंबाचा पानवडा
सरकारी कामाचा चुथऽऽडा
सरकारी कामाला सतराशे कारकुन
एकेकाची तोंडं घ्यावित पारखुन
एक एक तोंड लाच खाऊ
लाच खाऊ तोंडाला नाही लाज
जनतेच्या पैशाचा यांनाच माज.
माज रेऽ माज रेऽ सरकारी बाळा
कामा वरती फिरवा बोळा !
बोळ्यासाठी आणलं खादीचं कापड.
खादीच्या कापडाला वशिल्याची कड.
जनतेच्या कपाळी सदाची रड
रडतां रडतां जनता थकली
कराच्या ओझ्याखाली आणखी वाकली
सरकारी बाळानं वाजवली टाळी
जनतेनं गाठली सोनार आळी
'सोनार दादा, सोनार दादा
पुतळ्याची माळ बांधू नक्का.'
सोनारानं बांधलं चंबू-गबाळं
सरकारच्या नावानं काढलं दिवाळं!

## ३५. कहानी

रातभर सुनली जो
वह गज़ल किसकी थी?
रात उतरी तो जाना
शमाने अंगडाई ली थी ।।१।।

आँख खुलती भी न थी
क्या चीज पिलाई थी।
साकीने लबोंसे शायद
मय-ए-शबनम बरसाई थी।।२।।

ढूँढू तो नापाऊ दिल मे
जो धडकन हुआ करती थी।
धडकन चुरा ले गई वो
शायद दिलवाली थी ।।३।।

कभी गम, कभी मुस्कान
कभी धूप, कभी बारिष।
उलझन भरी दास्ताँ-
यह कहानी किसने लिखी थी?

* * *

३६. मन रे!

मन रे तोहे कैसे समझाऊ?
तर्क नित नये ढूँढ ना पाऊ ।।

इस जग में क्या पाया, खोया
सुख दुःखो का भार हि ढोया ।
आत्मरूपसे दूर तू गया
कैसे पास बुलाऊँ? ।।१।।

आदि अंत तक फला आँचल
माया का तू जान ले इस पल ।
अभंग भ्रम निद्रामे निश्चल
तूं, कैसे मैं जगाऊँ ।।२।।

नभ धरती की स्मृती सनातन
जिस पर अंकित है आक्रंदन।
तथा प्रभू की महिमा वर्णन
क्या क्या तुझे सुनाऊँ? ।।३।।

सुन मेरे प्यारे-बात पते की
जीवन नदी है बहकाओं की।
राह धरो गुरू पद चिन्होकी।
परे साथ चल जाऊँ ।।४।।

* * *

३७. दोहे

(संत कवी कबीरजी की क्षमा मांगकर)

ज्ञान न पूछो एम.पी.का पूछ लीजिये जात
क्या करना है ज्ञान का साबुत है दो हात ।।१।।

केसरी, केसरी सब कहें कहें सोनिया कोई
नाम श्रेष्ठी का जपे विना पी.एम्. कैसे कोई ।।२।।

रविवार को भजो केसरी नृसिंह का बुधवार
तांक रहो उस वार को जब हांवी होंगे पवार ।।३।।

कुर्सी नारी सुंदरी मोहक गुले गुर्जार
गौडा आसन छोड चले चढ चले गुजराल ।।४।।

जनता कहें सर्कारसे तू क्या रोंदे मोय
फिर इलेक्शन आएगा मै रौदूगी तोय ।।५।।

दस द्वारे की संसद ता में अनेक पंछी
रहें को अचरज है गये को अचंभा छीऽ! ।।६।।

संसद गये तो एक फल कुर्सी मिले फल चार
सत्ता मिले ते अनेक फल नेता करत विचार ।।७।।

कामी, क्रोधी लालची इन्ही से चले सरकार
धर्म नीति की बात करे वो नेता है बेकार ।।८।।

मंत्री किसे करे, न करे पी.एम् का अधिकार
पार्टी के कुछ जीव हैं सक्षम, कुछ लाचार ।।९।।

समझाए समझे नहि काँगी के हाथ बिकाय
खींचत है बी.जे.पी. तू युफ् काहे जाय? ।।१०।।

नाम पंथि, जद, काँगी टूट जुडे सौ बार

ढीले सांसद बीजेपिके एके धका दरार ।।११।।

खिन में चढे, खिनमे उतरे सो तो नेता न होय

जनता के हृदय बसे नेता कहावे सोय ।।१२।।

लूट सके तो लूट ले चमडा, चारा, चिनी

कुर्सी फिसल गई प्यारे तो मन मानी नही चलवी ।।१३।।

उजले कपडे और बाल पान तमाखु खाय ।

डब्लू सी की हां न मिली तो लालू पटना जाय ।।१४।।

घर के छतसे मैं पुकारूं राम रस में समा आ

सुनना है तो सुनलो किंवा सारे भाड मे जाओ ।।१५।।

* * *